# प्रेसनोट

**विषय :- संत श्री तुकाराम महाराज / संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी आगमन, मुक्काम व प्रस्थान आषाढी वारी पालखी सोहळा (दिनांक- १२/०६/२०२३ ते १५/०६/२०२३)**

---ooooo----

पुणे शहरात प्रतिवर्षाप्रमाणे आषाढी वारी पालखी सोहळा-२०२३ दिनांक १२/०६/२०२३ ते दिनांक १५/०६/२०२३ दरम्यान आगमन,मुक्काम व प्रस्थान असा होणार आहे. आषाढी वारी पालखी सोहळा हा ऐतिहासिक परंपरा असुन शहरात हा सर्वाधिक लोकप्रिय सोहळा बनला आहे, त्यामुळे पुणे शहर व राज्यातील तसेच परदेशातील पर्यटक सदरचा सोहळा पाहण्याकरीता व अभ्यास करण्याकरीता येत असतात. अत्यंत मनोभावे साजरा होणारा हा सोहळा आहे. या सोहळ्यामुळे शहर आणि परिसरात चैतन्य निर्माण होते. सदर पालखी महाराष्ट्रातील सर्वश्रेष्ठ संतांची असल्याने पालखीबरोबर महाराष्ट्रातील बहुतेक करून सर्व भागातील वारकरी या पालखी सोहळयात भाग घेण्यासाठी येतात. वारकरी पालखीचे सुरुवातीच्या ठिकाणापासून शेवटपर्यंत सोबत असतात. पालखी जसजशी पुढे जाते तसतशी वारक-यांची संख्या वाढत जाते. त्याशिवाय पालखीच्या पुढे आणि मागे ब-याच दिंडया असतात. अशाप्रकारे प्रत्येक पालखी बरोबर मोठा जनसमुदाय असतो. सदर पालखीशी लाखो भाविक लोकांच्या भावना निगडीत असलेने कोणत्याही परिस्थितीत या पालखींचे आगमनाचे व मुक्कामाचे ठिकाणी तसेच मार्गक्रमणाचे वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

- दि.१२/०६/२०२३ रोजी श्री. संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी पुणे शहर आयुक्तालयातील बोपखेल याठिकाणी आगमन होईल.तेथुन फुलेनगर येथे दुपारचे भोजन व विसावा नंतर संगमवाडी येथे विसावा घेवुन पालखी श्री पालखी विठोबा मंदीर, भवानी पेठ पुणे येथे मुक्काचे ठिकाणी आगमन होईल. (एकुण मार्ग १६ कि.मी)

- दि.१२/०६/२०२३ रोजी श्री. संत तुकाराम महाराज यांची पालखी पुणे शहर आयुक्तालयातील हॅरिष ब्रिज खडकी याठिकाणी आगमन तेथुन तुकारमा पादुका चौकात विश्रांती घेवुन पालखी श्री. निवडुंग्या विठोबा मंदीर नाना पेठ पुणे येथे मुक्काचे ठिकाणी आगमन होईल. (एकुण मार्ग ११ कि.मी)

- दि.१३/०६/२०२३ रोजी दोन्ही पालखी पुणे शहरांत मुक्कामी राहतील.

- दि.१४/०६/२०२३ रोजी श्री. संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी मुक्कामाचे ठिकाणाहुन निघुन हडपसर गाडीतळ येथे विसावा घेवुन दिवे घाट मार्गे सासवड (पुणे ग्रामिण हद्द) कडे मुक्कामी जाईल. (एकुण मार्ग २१ कि.मी)

- दि.१४/०६/२०२३ रोजी श्री. संत तुकाराम महाराज यांची पालखी मुक्कामाचे ठिकाणाहुन निघुन हडपसर गाडीतळ येथे विसावा घेवुन लोणी काळभोर या ठिकाणी मुक्कामी जाईल. (एकुण मार्ग १६ कि.मी)

- दि.१५/०६/२०२३ रोजी श्री. संत तुकाराम महाराज यांची पालखी मुक्कामाचे ठिकाणाहुन निघुन कुंजरवाडी, उरुळीकांचन, खेडकर मळा येथुन यवत (पुणे ग्रामिण हद्द) कडे मुक्कामी जाईल. (एकुण मार्ग १२ कि.मी)

- आषाढी वारी पालखी सोहळा बंदोबस्त दरम्यान कोठेही घातपाताची घटना घडणार नाही, चेंगराचेंगरी होणार नाही ,भाविकांना तसेच नागरिकांना असुविधा होणार नाही. भाविकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे ही पालखी सोहळा बंदोबस्ताची उद्दिष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत.

- महिलांची सुरक्षितता,चेन स्नॅचिंग, पीक पॉकेटींग या सारखे घटनांना प्रतिबंध करण्यासाठी गुन्हे शाखा व तपास पथकांच्या विशेष टिम नेमण्यात आलेल्या आहेत.

- संपूर्ण पालखी मार्ग व मुक्कामाच्या ठिकाणांची बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून (BDDS) व श्वान पथकांकडून संपुर्ण घातपात विरोधी तपासणी करण्यात येणार आहे.

- गर्दीच्या ठिकाणी व महत्वाचे ठिकाणी जलद प्रतिसाद पथके (QRT) तैनात करण्यात आली आहे.

- गतवर्षीप्रमाणे या वर्षी देखील श्री. संत ज्ञानेश्वर महाराज व श्री. संत तुकाराम महाराज यांचे पालखीचे Live Location ची लिंक पुणे शहर पोलीसाकडुन नागरीकांसाठी वेब पेज व समाज माध्यमांवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

- पालखी आगमन,मुक्काम व प्रस्थान दरम्यान पुणे शहरांतील कोणते रस्ते वाहतुकीसाठी बंद आहेत, कोणत्या बाजुने व कोणत्या मार्गाने वाहतुक वळविण्यात आली आहे. याबाबत माहीतीची लिंक सुध्दा नागरीकांसाठी व समाज माध्यमांवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

- नागरीकांचे सुविधेसाठी पालखी मार्गावर, विसावा, तसेच मुक्कामाचे ठिकाणी पोलीस मदत केंद्र उभारण्यात आली आहेत.

- पालखी सोहळयाचे नियोजन नियोजन योग्य प्रकारे होणेसाठी शासनाचे सर्व सबंधित ठिकाणी पी.डब्ल्यु.डी, मनपा, महावितरण, मेट्रो, अग्निशामक विभाग यांचेशी समन्वय बैठक घेण्यात आली आहे.

- श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त यांचेसोबत बैठक घेवुन समन्वय साधण्यात आला आहे.

- गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी ठिकठिकाणी बॅरिकेटींग करुन घेण्यात आले आहे.

- पालखी मार्ग, विसावा, तसेच मुक्कामाचे ठिकाणी येथे प्रभावी सीसीटीव्ही यंत्रण कार्यान्वीत करण्यात आली आहे.

- पालखी सोहळा बंदोबस्तसाठी पुणे शहर पोलीस आयुक्तलयातून एकुण ०२ अपर पोलीस आयुक्त, १० पोलीस उप आयुक्त, २० सहाय्यक पोलीस आयुक्त, ११६ पोलीस निरीक्षक, ४४३ सपोनि/पोउपनि, ५६९३ पोलीस अंमलदार असा बंदोबस्त पुणे पोलीस,वाहतुक विभाग, बीडीडीएस विभाग येथुन लावण्यात आला आहे. तसेच मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून ०१ एसआरपीएफ कंपनी, ५०० होमगार्ड असा पालखी सोहळा बंदोबस्त कामी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आला आहे.

----------------------------------------xxx----------------------------------------

# <u>संत श्री तुकाराम महाराज पालखी कार्यक्रम पत्रिका</u>

| दिनांक | पालखी निघण्याचे ठिकाण | पहीली विश्रांती | दुसरी विश्रांती | दुपारचा मुक्काम | तिसरी विश्रांती | चौथी विश्रांती | पालखीचा मुक्काम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सोमवार दि.१२/०६/२३ | आकुर्डी (विठ्ठल मंदीर) | एच.ए.कॉलनी पिपरी | कासारवाडी | दापोडी | शिवाजीनगर **(पुणे शहर पो. आयुक्तालयात आगमन)** | संत तुकाराम महाराज पादुका मंदीर फर्ग्युसन रोड | श्री. निवडुंग्या विठोबा मंदीर नाना पेठ पुणे |
| मंगळवार दि१३/६/२३ | संपुर्ण दिवस श्री निवडुंग्या विठ्ठल मंदीर पुणे (मुक्काम) | | | | | | श्री. निवडुंग्या विठोबा मंदीर नाना पेठ पुणे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बुधवार दि.१४/६/२३ | श्री. निवडुंग्या विठोबा मंदीर नाना पेठ पुणे | भैरोबा नाला | - | हडपसर | मांजरी फार्म | लोणी काळभोर रेल्वे स्टेशन | लोणी काळभोर (श्री विठ्ठल मंदीर) |
| गुरूवार दि.१५/६/२३ | लोणी काळभोर (श्री विठ्ठल मंदीर) | कुंजीरवाडी फाटा | | उरळी कांचन फाटा | खेडकर मळा | **पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतून पुणे ग्रामीण हद्दीत प्रवेश** | |

## संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी कार्यक्रम पत्रिका

| दिनांक | पालखी निघण्याचे ठिकाण | सकाळचा विसावा | दुपारचे भोजन व विसावा | दुपारचा विसावा | पालखी मुक्काम | |
|---|---|---|---|---|---|---|
| सोमवार दि.१२/०६/२३ | आळंदी | थोरल्या पादुका आरती भोसरीफाटा | फुलेनगर **(पुणे शहर पो. आयुक्तालयात आगमन)** | संगमवाडी | श्री. पालखी विठोबा मंदीर भवानी पेठ पुणे | |
| मंगळवार दि.१३/०६/२३ | | श्री. पालखी विठोबा मंदीर भवानी पेठ पुणे | | | | श्री. पालखी विठोबा मंदीर भवानी पेठ पुणे |
| बुधवार दि.१४/०६/२३ | श्री. पालखी विठोबा मंदीर भवानी पेठ पुणे | शिंदे छत्री आऱती हडपसर | | उऱळी देवाची | वडकी नाला झेंडेवाडी | **पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतून पुणे ग्रामीण हद्दीत प्रवेश** |